# जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय मार्फ़त राबवीण्यात येणा-या विविध शासकिय योजनाची माहीती

**१) बालगृहे योजना-**

यवतमाळ जिल्ह्यातील बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २००० अन्वये काळजी व संरक्षणची गरज असलेल्या बालकांसाठी यवतमाळ जिल्ह्या**त** एकूण 34 बालगृहे कार्यरत असून, त्यांची एकूण क्षमता 1800 प्रवेशितांची आहे. बालगृहमध्ये प्रवेशितांना अन्न वस्त्र निवारा वैद्यकीय सुविधा तसेच त्यांचे पुनर्वसन करण्यात येते.

**प्रवेशाची पध्दत-** बालगृहमध्ये प्रवेशासाठी बालक हा बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २००० कलम 2(ड) अन्वये काळजी व संरक्षणची गरज असणारा असावा व बाल कल्याण समिती,चापमनवाडी यवतमाळ मार्फत प्रवेशित दाखल करण्यात येतात. बाल कल्याण समिती समोर कुठल्याही प्रकारच्या काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांना समाजाकरीता काम करणारा कुठलाही व्यक्ती हा बालकाला बाल कल्याण समिती समोर हजर करु शकतो.

**२) बाल संगोपन योजना-**

बालसंगोपन योजनेंतर्गत लाभार्थी बालकाला रु.४२५/प्रती महिना वय वर्ष १८ पर्यंत लाभ देण्यात येतो**.** या योजनेंतर्गत संगोपन करणा-या पालकास 425/महिना बालकांच्या अन्न वस्त्र निवारा व शैक्षणिक गरजा भागविन्याकरीता शासना मार्फ़त लाभ दिला जातो व सदर योजना राबविणा-या संस्थेला प्रती लाभार्थी ७५ रु./महिना देण्यात येतात.

**अर्ज करण्याची पध्दती -** विहित नमुण्यात लाभार्थ्यांनी अर्ज बाल कल्याण समिती,चापमनवाडी यवतमाळ यांच्याकडे सादर करणे आवश्यक आहे. अर्जाचानमुना विनामुल्य बाल कल्याण समिती,यवतमाळ यांच्याकडे उपलब्ध आहे.

**लाभर्थिच्या पात्रतेच्या अटी -** बालक हा बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २००० कलम 2(ड) अन्वये काळजी व संरक्षणची गरज असणारा असावा. व बालक हा वय वर्ष 6 ते 18 या वयोगटातील असणे आवश्यक आहे.यामध्ये विशेत: बाल कामगार,बंदयाची मुले,दुर्धर आजाराने पिडीत असलेल्या पालकांची मुले,अनाथ बालके इ.प्रकारच्या बालकांना प्राधान्याने लाभ दिला जातो.

**३) मनोधैर्य योजना-**

बालकावरील किंवा महिलांवरील लैंगिक अत्याचार किंवा असिड हल्यात बळी पडलेल्या महिला व बालकांना अर्थसहाय्य करणे व त्यांच्या पुनर्वसनासाठी मनोधैर्य योजना हि नवीन योजना महिला व बालविकास विभाग मार्फत शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०११/प्र.क्र०६/का.-२ मुबई – दि.२१ ऑक्टोंबर २०१३ पासुन राज्यात सुरु झाली. या योजनेच्या अमलबजावणी करिता मा.जिल्हाधीकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा क्षती सहाय्य व पुनर्वसन मंडळ गठीत करण्यात आले आहे.

**अर्ज करण्याची पध्दत-** बालकावरील किंवा महिलांवरील लैंगिक अत्याचार किंवा असिड हल्यात बळी पडलेल्या महिला व बालकांनी ज्या पोलिस स्टेशन अंतर्गत गुन्हा घडला असेल त्या पोलिस स्टेशन प्रमुखा मार्फत एफ़.आय.आर.प्रत या कार्यालयास सादर होणे आवश्यक आहे. अशा रीतीने प्राप्त प्रकरणे मा.जिल्हाधीकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत जिल्हा क्षती सहाय्य व पुनर्वसन मंडळा समोर ठेवले जाते व समितीचे निर्णयानुसार लाभ दिला जातो.

शासन निर्णयानुसार पिडीतेला रु. 2 लाख तसेच गंभिर इजा पोहचल्यास रु.3 लाखा पंर्यत या योजनेतंर्गत अर्थसहाय दिले जाते..

**४) शेतकरी/शेतमजूरांच्या मुलींच्या विवाहाकरिता सामुहीक विवाह योजना / नोंदणिकृत विवाह योजना-**

यवतमाळ जिल्ह्यातील शासन निर्णय क्र.संकीर्ण-२००५/प्र.क्र २४२/का.-२ मुबई – दि. १७ फेब्रुवारी२००६ अन्वेय शेतकरी/शेतमजूरांच्या मुलींच्या विवाहाकरिता सामुहीक विवाह योजना राबविण्यात आली आहे शासन निर्णय क्र.संकीर्ण-२००८ /प्र.क्र ५५/का.-२ मुबई – दि.२ मे २००८ पासुन सदर योजना शेतकरी/शेतमजूरांच्या मुलींच्या विवाहाकरिता शुभमंगल सामुहीक विवाह योजना या नावाने संपूर्ण महाराष्ट्रात लागू करण्यात आली. शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०११/प्र.क्र ९३/का.-२ मुबई – दि. ३० सप्टेंबर २०११ अन्वेय शुभमंगल सामुहीक विवाह योजना/नोंदणीकृत विवाह योजना सुधारित स्वरुपात जिल्हा नियोजन विकास समिती मार्फत जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. **या योजनेमार्फत विवाहित मुलीच्या आईच्या बँक खात्यात रु.१००००/- एवढे अनुदान जमा करण्यात येते. तसेच सामुहिक विवाह आयोजित करणा-या संस्थेला प्रत्येक जोडप्यामागे 2000 रु अनुदान देण्यात येतात.**

**या योजनेतंर्गत शेतकरी/शेतमजुरांनी आपल्या मुलीचा विवाह जर नोंदणी पध्दतीने केलेला असेल तर अशा लाभार्थ्यांना सुध्दा वैयक्तीक रु.10000/- एवढे अनुदान दिल्या जाते.**

**५) कौटुंबिक हिंसाचारा पासून महिलाचे संरक्षण-**

कौटुंबिक हिंसाचार पासून महिलाचे संरक्षण अधिनियम २००५ व नियम २००६ नुसार सदरचा कायदा दि. २६/१०/२००६ पासून संपूर्ण देशात अमलात आला.

**कायद्याचा उद्देश –**

१) महिलांना कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण देणे
२) महिलांना घरात सुरक्षितता लाभावी व त्यांना बेघर केल्या जाऊ नये.
३) महिलांना सदर प्रकरणी तात्काळ मदत देणे व त्यांच्या प्रकरणाचा लवकर निपटारा करणे
४) महिलांचे महत्व कायमस्वरूपी निरंतर राहण्यासाठी कठोर कायदेशिर उपाययोजना करणे.

या अधिनियमान्वये शासनाने सध्यस्थितीत दोन तालुके मिळून एका संरक्षण अधिका-याची नियुक्ती केलेली असून सध्यास्थितीत जिल्ह्यात नियमित ६ संरक्षण अधिकारी कार्यरत आहेत व इतर तालुक्यात संबधित एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी संरक्षण अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्यात आलेली आहे.

कौटुंबिक हिंसाचारग्रस्त पिडीत महिलांनी सबंधित संरक्षण अधिकारी यांच्याशी **तालुक्यात संबधित एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालयात** संपर्क साधावा. व जिल्हाच्या ठिकाणी या कार्यालयाशी संपर्क साधावा.या अधिनियमातंर्गत जिल्हयात एकुण 8 सेवा पुरविणाऱ्या संस्था सुध्दा कार्यरत आहेत.सदर संस्था हया अधिनियमान्वये पिडित महिलेला आवश्यक असलेल्या मा.न्यायालायाच्या आदेशाने सेवा पुरवितात.

**६) महिला समुपदेशन योजना-**

शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग क्र.समुप-२०13/प्र.क्र 05/का.-10 मुबई – दि. 04 जानेवारी 2014 अन्वेय महिलांवर व बालंकावर अत्याचारांना प्रतिबंध करुन, त्याना संरक्षण/मदत उपलब्ध करुन देण्याचे उददेशाने खालील ठिकाणी यवतमाळ जिल्ह्यात महिला समुपदेशन केंद्रे कार्यारत आहेत.

| अ.क्र. | जिल्ह्यात मंजुर झालेल्या समुपदेशन केंद्राचे नाव,पत्ता,व दुरध्वनी क्र. | जिल्ह्यात समुपदेशन केंद्र कार्यरत असलेले ठिकाण |
|---|---|---|
| १ | फुले-आंबेडकर महिला प्रबोधनी,पाढरकवडा व्दारा संचालित महिला समुपदेशन केंद्र पोलिस स्टेशन, पाढंरकवडा | पाढंरकवडा पोलिस स्टेशन परिसर,पाढरकवडा |
| २ | स्वा.पंडीतराव मस्के, बहु.संस्था धनसळ ता. पुसद | पुसद पोलिस स्टेशन परीसर,पुसद |
| ३ | तेजस्विनी बहु.सेवाभावी संस्था दारव्हा | दारव्हा पोलिस स्टेशन परिसर, दारव्हा |
| ४ | टाटा सामाजिक विज्ञान संस्था,मुंबई व्दारा संचालित महिला समुपदेशन केंद्र, जिल्हा पोलिस अधिक्ष्क कार्यालय, यवतमाळ | जिल्हा पोलिस अधिक्ष्क कार्यालय, यवतमाळ येथे कार्यरत. |

**७) सर्व समावेशक महिला समिती-**

शासन निर्णय महिला व बाल विकास विभाग क्र.सकिर्ण-२०11/प्र.क्र 26/का.-02 मुबई – दि. 02 नोव्हेंबर 2011 अन्वये महिलाच्या संरक्षणासाठी हुंडा निर्मुलन,कौटुंबिक हिसाचारापासुन महिलांचे संरक्षण, देवदासी प्रथा निर्मुलन, अनैतिक व्यापार (प्रतीबंध) यासारख्या महिला धोरणेच्या व कायद्याच्या प्रभावी अमंलबजावनी करण्याकरीता मा.जिल्ह्याधिकारी यांच्या अध्यक्षते खाली समित्या गठित करण्यात आलेले आहे. या सर्व समितिच्या प्रभावी अमलंबजवणी करण्याकरीता सर्व समित्या एकत्रित करुन सर्व समावेशक जिल्हा सल्लागार समिती जिल्हयात कार्यरत आहे. सदर समितीची बैठकीचे तिमाही आयोजन सदस्य सचिव जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी करतात.

सदर समिती ही जिल्हयातील महिलांच्या समस्यांच्या अनुषगांने काम करते तसेच हुडां बळी,महिलांवरील अत्याचार,अनैतिक व्यापार प्रतिबंध या बाबतचा आढावा समितीत मा.जिल्हाधिकारी यांच्या अधक्षते खाली घेण्यात येतो.

सेवा सुविधा प्राप्त न झाल्यास तक्रारी करीता सपंर्क-

**श्रीमती अर्चना □गोले**
**जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय,**
**दगडी □मारत, टांग़ा चौक, यवतामाळ**
**दूरध्वनी व भ्रमणध्वनी क्र. 07232-246921, 9011294251**